महाराष्ट्र टाइम्स

७ जानेवारी २०१६

**कोणत्याही क्षेत्रात तंत्रज्ञानाआधारे गरिबांचा विकास घडविण्याच्या उद्देशाने फोर्थ ब्रेन मेथड ही शिक्षण पद्धती विकसित झाली होती. मेंदूच्या फारसा वापर न होणाऱ्या भागाचा वापर करणे हा या शिक्षण पद्धतीचा आधार. याच शिक्षण पद्धतीचा वापर करून आदिवासींच्या विकासासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी क्रायसिस फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे. पायाभूत शिक्षण, तंत्रज्ञान, रोजगार या माध्यमातून ते आदिवासी युवकांपर्यंत पोहोचत आहेत.**

संस्थावृत्त

# आदिवासींच्या विकासासाठी...

सीमा शेख - देसाई



संगीत शिकण्याच्या निमित्ताने एकत्र आलेले दहा युवक वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत होते. मात्र, त्यांचा ध्यास एकच होता. तंत्रज्ञानाच्या आधारे विकासाची सोबत होती आणि यातूनच कामाला प्रारंभ झाला. तीन वर्षांपूर्वी क्रायसिसची स्थापना झाली. मात्र, त्याआधीपासूनच अशा वेगळ्या वाटेवरच्या कामाला प्रारंभ झाला होता. शिक्षण क्षेत्रात संशोधन करीत असतानाच शिक्षणाची सर्वाधिक गरज कोणाला आहे, याचा अभ्यास करीत अगदी ओडिशामधील आदिवासींपर्यंत जाऊन या युवकांनी काम केले. तेथील समस्यांचा जवळून अभ्यास केला. आता हे काम महाराष्ट्रापुरते मर्यादित न ठेवता ते भारतभर करण्याचा मानस घेऊन घोडदौड सुरू ठेवली आहे.

ठाण्यात येऊर येथे आदिवासी पाड्यांवर १४ आदिवासी मुलांबरोबर क्रायसिसचे काम सुरू आहे. येथील कॉलसेंटरमध्येही मुला-मुलींना प्रशिक्षण देऊन रिकाम्या हातांना काम मिळवून देण्यात येत आहे. अपंग मुलांचाही यात समावेश आहे. अनेक मुलांना अंकगणित, व्यावहारिक गणित शिकविण्यापासून सुरुवात करावी लागली. दहावीपर्यंत शिक्षण झाले असले, तरीही त्याचा दर्जा सुमार होता. त्यामुळे या मुलांना प्रवाहात आणण्यासाठी आणखी प्रयत्न झाले पाहिजेत, असे क्रायसिसचे प्रतिनिधी सांगतात. डॉ. सरिता पारीख, जर्मनीची क्लारा कोपल, बारबरा बिंडर, डायरेक्टर ग्लेन फर्नांडिस आणि अपूर्वा आगवण यांच्या पुढाकारातून युवकांची मोठी फळी काम करीत आहे.

क्रायसिसचे युवक कोणत्याही देणग्यांवर अवलंबून राहात नाहीत. एका ठिकाणी काम करून त्या कामाचा जास्त ठिकाणी वापर कसा करता येईल, त्यांचा आदिवासी पाड्यांवर सगळ्यांच्या समस्या एक प्रकारच्या आहेत. त्यांना भेडसावणारे प्रश्नही थोड्या फार फरकाने भिन्न असतील, या सगळ्यावर तोडगा काढण्यासाठी ही मंडळी कार्यरत आहेत. आदिवासींचे पुनर्वसन आणि विकास तसेच जगण्यासाठी लागणाऱ्या प्राथमिक गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहोचविणे हेच फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी शैक्षणिक, वैद्यकीय, व्यवसायाभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न आहेत.

शिक्षण, पायाभूत सुविधा या प्रश्नांबरोबर आरोग्याची समस्यादेखील गंभीर आहे. विंचू, सापांचे दंश या सगळ्याबरोबर आदिवासी रोजच लढत असतात. याचे गांभीर्य लक्षात घेऊन क्रायसिसने अत्याधुनिक अम्ब्युलन्स दिली, त्याचे पेटंटही घेतले. कमी खर्चातील व्हेंटिलेटर्स तयार केले. आपत्कालीन परिस्थितीत माणसाचा जीव वाचवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे, हाच उद्देश. मोठ्या संख्येने अशा व्हेंटिलेटर्सची निर्मिती करण्याचा फाउंडेशनचा प्रयत्न आहे. त्यायोगे असे व्हेंटिलेटर्स मोठ मोठ्या हॉस्पिटल्सना विकून ता येतील आणि त्यातून आदिवासी पाड्यांच्या विकासाचा खर्च निघू शकेल, असा फाउंडेशनचा प्रयत्न आहे.